अधीक्षक अभियंता,
दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ पाटबंधारे विभाग,
पत्रपेटी क्र.५४०, जुन्या हायकोर्टच्या मागे स्नेहनगर, औरंगाबाद - ४३१००५
☎: ०२४०-२३३४७४६ फॅक्स : २३३४७४६.
➤ E-mail : se_vigilance@bsnl.in ➤

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन,

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,
सरळसेवा भरती प्रादेशिक निवड समिती (ज.सं.वि.) औरंगाबाद
जाहिरात.क्र.२ सन २०११

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र. पदनि.२०१०/प्रक्र.८३/१०/ वित्तीय सुधारणा.१, दिनांक २९.११.२०१० व शासनपत्र क्र. संकीर्ण.२०१२/ २३१०/ (४१६/११) आ(अतां), दिनांक १९.१०.२०११ अन्वये प्राप्त सूचनेनुसार सरळसेवेची रिक्त पदे भरण्यास मान्यता मिळाली आहे. मागास प्रवर्गांची अनुशेषाची पदे, चालु आरक्षणाची मागासवर्गीयांची पदे व अपंग अनुशेषाची पदे, खुल्या प्रवर्गातील पदे बिंदु नामावली नुसार भरण्याचे प्रस्तावित आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कालवा निरीक्षक, मोजणीदार, दप्तर कारकुन, वरिष्ठ लिपीक, भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल, या गट-क संवर्गातील रिक्त पदांचा व गट-ड मधील शिपाई, चौकीदार व कालवा चौकीदार या पदांचा समावेश आहे.

जलसंपदा विभागातील गट-क व गट-ड संवर्गाच्या सरळसेवा भरतीसाठी गठीत केलेल्या प्रादेशिक निवड समिती स्तरावरुन मागासवर्गीय प्रवर्गातील व खुल्या प्रवर्गातील उमेदवारां कडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

जलसंपदा विभाग, प्रादेशिक निवड समिती गट-क व गट-ड संवर्ग, औरंगाबाद यांच्या वतीने सरळसेवा भरती कामकाजासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या.पुणे (MKCL) या संस्थेस प्राधिकृत केले आहे. भरती प्रक्रियेचा रिक्त पदाचा सामाजिक व समांतर आरक्षणाचा तक्ता स्वतंत्रपणे दिला आहे.

खेळाडु, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, महिला, पदवीधर/पदविकाधारक, अंशकालीन कर्मचारी यांचेकरिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असुन ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.

अपंग आरक्षणांतर्गत भरण्यात यावयाच्या पदासाठी सामाजिक आरक्षण लागु नाही.

## १. सर्वसामान्य अटी ( वयोमर्यादे बाबत ) :

१.१ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामधे संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहील्यास व अर्ज नाकारला गेल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी असल्यास / उमेदवारास अर्ज भरणे शक्य होत नसल्यास त्यांना (MKCL) यांच्या अधिकृत केंद्रावर मार्गदर्शन व मदत उपलब्ध होऊ शकेल .

१.२ उमेदवाराची लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल .

१.३ सर्व उमेदवारांचे वय दिनांक ०१.०१.२०१२ रोजी किमान १८ वर्षे पूर्ण तर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा कमाल ३८ वर्षे अशी राहील.

१.४ अंशकालीन कर्मचारी उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४६ वर्षांपर्यंत शिथीलक्षम राहील. तर शासकीय सेवेतील कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५० वर्षांपर्यंत शिथीलक्षम राहील.

१.५ माजी सैनिक : सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिका मधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवा काल अधिक ३ वर्षे एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्ष पर्यंत राहील.

१.६ स्वातंत्र्य सैनिकाचे नाम निर्देशित पाल्य, १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील .

१.७ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथीलक्षम राहील.

१.८ सर्व प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत राहील.

१.९ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गासाठी सन १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्रशिक्षण विभागाची शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची १ वर्ष मुदतीची पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे, त्या उमेदवारांच्या बाबतीत शासकीय तंत्रशिक्षण विभागाकडे त्यांच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा ४७ वर्षेपर्यंत राहील .

१.१० अपंग उमेदवारांचे बाबतीत उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधीत पदावर काम करु शकेल, असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

**<u>२. सर्वसाधारण अटी</u> :-**

२.१ उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परिक्षेसाठी ( लेखी / मौखिक) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या.पुणे (MKCL) यांच्या मार्फत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण : ( Website- संकेत स्थळ www.oasis.mkcl.org/wrd2011)

२.२ उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अंतिम निवड झाल्यानंतर अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या महसूल विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणित प्रमाणपत्र ( डोमीसाईल ) सादर करणे आवश्यक राहील .

२.३. उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यांत येणार असल्याने परीक्षेसाठी विहीत केलेला नमुना अर्ज (Website- संकेत स्थळ www.oasis.mkcl.org/wrd2011) तसेच संस्थेच्या संबंधीत अधिकृत केंद्राची माहिती संकेत स्थळावर मिळेल.

२.४ ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपुर्वी जलसंपदा विभागाकडे व या विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयाकडे नोकरीसाठी अर्ज सादर केलेले आहेत ते अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२.५ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना प्राधान्यक्रम देणे बंधनकारक आहे. उदा. दप्तर कारकुन, कालवा निरीक्षक व मोजणीदार या संवर्गाची प्रश्नपत्रिका एकच असेल, परंतु उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे.

उमेदवाराच्या माहितीसाठी नमुना दाखल प्राधान्यक्रमाचा तक्ता खालील प्रमाणे आहे .

तक्ता क्र.१

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दप्तर कारकुन | १ | **किंवा** | दप्तर कारकुन | १ | **किंवा** | दप्तर कारकुन | ३ |
| कालवा निरीक्षक | २ | | कालवा निरीक्षक | ३ | | कालवा निरीक्षक | १ |
| मोजणीदार | ३ | | मोजणीदार | २ | | मोजणीदार | २ |

**किंवा**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दप्तर कारकुन | २ | **किंवा** | दप्तर कारकुन | २ | **किंवा** | दप्तर कारकुन | ३ |
| कालवा निरीक्षक | ३ | | कालवा निरीक्षक | १ | | कालवा निरीक्षक | २ |
| मोजणीदार | १ | | मोजणीदार | ३ | | मोजणीदार | १ |

तक्ता क्र.२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भांडारपाल | १ | **किंवा** | भांडारपाल | २ |
| वरिष्ठ लिपीक | २ | | वरिष्ठ लिपीक | १ |

२.५ परीक्षा शुल्क हे खालील प्रमाणे --

| अक्र | परीक्षा व पदांचा गट तपशिल | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | लेखी परीक्षा | | |
| | गट-१) वरिष्ठ लिपीक, भांडारपाल | ३५०/- | १७५/- |
| | गट-२) सहाय्यक भांडारपाल | ३५०/- | १७५/- |
| | गट-३) कालवा निरीक्षक/दप्तर कारकुन/मोजणीदार | ३५०/- | १७५/- |
| २ | लेखी परीक्षा व मुलाखत | | |
| | गट-४) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ४००/- | २००/- |
| | गट-५) चौकीदार, कालवा चौकीदार, शिपाई | ४००/- | २००/- |
| ३ | माजी सैनिक उमेदवारांना शुल्क भरण्याची अट लागु नाही . | | |

परीक्षा शुल्क MKCL संस्थेच्या अधिकृत केंद्रात रोखीने स्विकारले जाईल. सदर सेवाशुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील. अर्ज भरताना MKCL च्या अधिकृत केंद्रावर मार्गदर्शन व अर्ज भरण्यासाठी मदत यासाठी रु.२५/- प्रति उमेदवार अतिरिक्त भरावे लागतील .

२.६ ज्या पदाकरिता अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे, अशा पदांकरिता लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व गणित या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील.

२.७ ज्या पदांची अर्हता पदवी आहे अशा व्यावसायिक / तांत्रिक पदांकरिता परिक्षेचा अभ्यासक्रम मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जासमान राहील. मराठी या विषयाच्या प्रश्नांचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १२ वी) च्या दर्जासमान राहील. लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील.

२.८ व्यावसायिक / तांत्रिक पदांसाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक लेखी परीक्षा १०० गुणांची, व्यावसायिक / प्रात्यक्षिक चाचणी ८० गुणांची व मौखिक परीक्षेस २० गुण राहतील. अशाप्रकारे एकूण २०० गुणांची लेखी, व्यावसायिक / प्रात्यक्षिक चाचणी व मौखिक परीक्षा होईल.

अतांत्रिक पदासाठी (कालवा निरीक्षक, मोजणीदार, दप्तर कारकुन, वरिष्ठ लिपीक, भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल) लेखी परीक्षा २०० गुणांची राहील .

२.९ शिपाई, चौकीदार, कालवा चौकीदार, या पदांसाठी लेखी परीक्षा ७५ गुणांची होईल. या पदासाठी पात्र उमेदवाराची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल .

२.१० ज्या पदांसाठी मौखिक परीक्षा ठेवली आहे, अशा पदांसाठी उमेदवाराच्या लेखी व जेथे आवश्यक आहे तेथे प्रात्यक्षिक परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखती करिता पात्रता ठरवून अशा उमेदवारांची २० गुणांची मौखिक परिक्षा घेण्यात येईल. लेखी, व्यावसायिक / प्रात्यक्षिक व मौखिक परिक्षेचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. उमेदवाराची कागदपत्रे व्यवस्थित नसल्यास मुलाखत घेतली जाणार नाही . मौखिक परिक्षेसाठी गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.

२.११ सर्व पदांसाठी वरीलप्रमाणे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेतून निवड होण्यासाठी, किमान ४५ टक्के (पंचेचाळीस टक्के) एवढे गुण किमान पात्रता गुण म्हणुन मिळवावे लागतील.

२.१२ ज्या पदांसाठी व्यावसायिक परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा नाही, अशा पदावरील उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधे अंतर्भाव होईल, अशा उमेदवारांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनुसार त्यांच्या कागदपत्र छाननीसाठी ठरवुन दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवुन दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रे व छायांकीत (साक्षांकीत) प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी, वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास, त्याचे नांव गुणवत्ता यादीतून काढून टाकले जाईल. याबाबत कोणतीही विनंती / तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२.१३ ज्या पदासाठी प्रात्यक्षिक परिक्षा/मौखीक परिक्षा आहे, अशा पदांच्या मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांची छाननी प्रात्यक्षिक/मौखीक परिक्षेच्या वेळी करण्यात येईल.

२ १४ परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

(१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यांनतर
(२) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसुचित जमाती मधील नंतर अनुसुचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी ९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर
(३) शारीरीकदृष्ट्या अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर
(४) माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर
(५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर
(६) वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

३. पदासाठी अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराची लेखी परीक्षा औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली व नांदेड येथे होईल. प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार परीक्षा केंद्रामध्ये वाढ किंवा घट होऊ शकते. परीक्षा केंद्रांचा संकेतांक क्रमांक, तसेच लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर व MKCL यांचे अधिकृत केंद्रांवर उपलब्ध राहील. परीक्षेचे प्रवेशपत्र विनंती केल्यास

MKCL च्या ज्या केंद्रावर ऑनलाईन अर्ज भरला आहे त्या अधिकृत केंद्रावर मिळेल. परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळा वरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. व उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. परीक्षेचा दिनांक, वेळ व परीक्षेची रुपरेषा व तसेच परीक्षा केंद्राची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध राहील. उमेदवारास परीक्षेस स्वखर्चाने यावे लागेल.

३.१ काही अपरिहार्य कारणाने उमेदवार परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त करु शकला नाही तर त्यांनी अर्ज भरल्याची खात्री होणारी अधिकृत कागदपत्रे व फोटोसह ओळखपत्र दाखविल्यास व त्याचे नांव यादीत समाविष्ट असल्याचे निदर्शनास आणल्यास त्यास परीक्षेस बसण्याची अनुमती देण्यात येईल. याबाबतचा परीक्षा नियंत्रकांचा निर्णय अंतिम राहील.

४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार व कौशल्यविकास कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी सदर पदासाठी विहित नमुन्यात स्वतंत्र ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे .

५. शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला तसेच आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे.

६. विहीत मर्यादेतील शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत मुलाखत/नियुक्तीच्या वेळी सादर करावी लागेल.

७. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक १.३.२०११ नंतरचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी व नियुक्तीच्या वेळी सादर करावे लागेल.

८. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक १.३.२०११ नंतरचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमणपत्र नियुक्ती/मुलाखतीच्या वेळेस सादर करावे लागेल.

९. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै २००५ नुसार विहित केलेल्या नमुन्यातील लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी व नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अविवाहित असल्यास उमेदवारांनी विहित नमुन्यातील प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी व नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ठ अ मधील नमुद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असावे. खुल्या प्रवर्गातील खेळाडुना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्या बाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१.३.२०११ नंतरचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र / नुतनीकरण प्रमाणपत्र मुलाखतीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना तासिका, नियतकालिक, अंशकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणुकीचा

कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी ग्राहय धरला जाणार नाही. पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामधे ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामधे केलेली असली पाहीजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केल्याचे पुरावे उमेदवारास मुलाखतीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करावे लागतील.

१२. उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नांव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत नियुक्ती/मुलाखतीच्या वेळेस सादर करावी लागेल.

१३. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. सेप्रनी.१००८/ (१४४/०८) आस्थापना (अतांत्रिक), दिनांक २८.११.२०११ नुसार कालवा निरीक्षक, मोजणीदार व दप्तर कारकून या पदांसाठी नियुक्तीनंतर सेवाप्रवेशोत्तर तीन महिन्यांचे प्रशिक्षण (३) वर्षाच्या आंत विभागीय परीक्षा दोन संधीत उत्तीर्ण होणे, व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सेवा प्रवेश व सेवा प्रवेशोत्तर नियमांचा शासनाने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

१४. औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर सर्व जिल्ह्यातील परीक्षा एकाचवेळी आयोजित केली जाईल. त्यास्तव अर्हतेनुसार पात्र उमेदवारांनी एका गटातील पदासाठीच अर्ज करणे आवश्यक राहील.

१५. अपंग प्रवर्गातील उमेदवाराने किमान अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्या बाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र व या बाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन नियुक्तीच्या वेळी व मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

१५.१ जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांकः अपंग.१२१०/प्र.क्र.३३६/ २०१०/आ (तां), दिनांक १३.०१.२०११ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अपंग संवर्गासाठी पात्र उमेदवारास नियुक्ती पूर्वी शारिरीक पात्रते संदर्भात संबंधित विषयांच्या तज्ञांचा समावेश असलेल्या वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केल्यानंतर व वैद्यकीय मंडळाने सक्षम ठरविल्यास सरळसेवेद्वारे भरतीने नियुक्ती करण्यांत येईल.

१५.२ अपंग उमेदवारांना लेखनिक आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची शैक्षणिक पात्रता, पदास आवश्यक शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावी. तसेच लेखनिक आवश्यक असल्याबाबतची लेखनिकाची शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, ओळखपत्र इ.बाबतच्या तपशिलासह लेखी स्वरुपात स्वतंत्र देणे बंधनकारक राहील. ऐनवेळी लेखनिकाची परवानगी देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच परीक्षा शुल्का व्यतिरीक्त लेखनिकाची परीक्षेच्या एका सत्राची शुल्क रक्कम रुपये १००/- स्वतंत्रपणे MKCL च्या अधिकृत केंद्रात जमा करावी लागेल. व ती नापरतावा राहील.

१६. जाहिरातीतील रिक्त पदांच्या एकूण संख्येत व तसेच जात प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणाच्या पदसंख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजीक समांतर आरक्षण यामध्ये बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जलसंपदा विभागाने गठीत केलेली औरंगाबाद प्रादेशिक निवड समिती राखुन ठेवत आहे. याबाबत समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही. भरती प्रक्रिये संदर्भात उदभवणारे वाद, तक्रारी, इत्यादी बाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील .

१७. राखीव जाती प्रवर्गाच्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र साक्षांकित प्रत सादर केल्याशिवाय उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही. ही अट शासन निर्णय क्र. बीसीसी/२०११/ प्रक्र.१०६४/२०११/ १६-ब, दिनांक १२.१२.२०११ अन्वये रद्द करण्यात आली आहे. यास्तव नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासुन सहा

महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समिती कडुन करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास नियुक्ती आदेश रद्य केले जातील. उमेदवाराने इतर सर्व प्रमाणपत्रांच्या (शैक्षणिक अर्हता, वय, जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, अनुभवाचा दाखला, महाराष्ट्रातील रहिवासी, समांतर आरक्षण, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड साठी नॉन क्रिमी लेअरचा दाखला, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाची नोंदणी, खेळाडूंचे प्रमाणपत्र, अंशकालीन कर्मचारी असल्यास त्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्यास त्यांचे नोंदणी पत्र, अपंगत्वाचा सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला व ईतर अनुषंगिक प्रमाणपत्रे) मुळ प्रती पदास पात्र उमेदवारांना नियुक्ती दिलेल्या महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग औरंगाबाद परिमंडळातील संबंधित कार्यालयाकडे तपासणीस्तव मुलाखत्ीच्या/नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांची छाननी केल्यानंतर व सर्व कागदपत्रे बरोबर आढळल्यानंतरच पात्र उमेदवारास शासकीय सेवेत नियुक्ती देण्यांत येईल.

१८. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहीत केलेले प्रमाणपत्र मुलाखतीचे वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१९. नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेतन व भत्ते मिळतील. निवड झालेल्या उमेदवाराची जलसंपदा विभागा अंतर्गत असलेल्या औरंगाबाद प्रादेशिक विभागातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यांत येईल आणि त्यांच्या सेवा बदलीपात्र असतील. तसेच नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००५ अनुसार लागु करण्यांत आलेली परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

२०. शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

| अक्र | गट क्र. | पद ( गट-क ) | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | १ | वरिष्ठ लिपीक { Sr. Clerk }<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रु.२४०० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण . |
| २ | १ | भांडारपाल { Store-Keeper }<br>वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रु.४२०० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण . |
| ३ | २ | सहाय्यक भांडारपाल { Assistent Store Keeper }<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रु.१९०० | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण . |
| ४ | ३ | १) मोजणीदार Measurer<br>२) दप्तर कारकुन Dafter Karkun<br>३) कालवा निरीक्षक Canal Inspecter<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रु.१९०० | १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची इ.१२ वी परीक्षा<br>किंवा<br>या परीक्षेशी समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br>किंवा<br>कृषि विद्यापीठाचा दोनवर्षाचा कृषि पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>२) शासकिय वाणिज्य संस्थेचे मराठी टंकलेखन वेग ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेग उत्तीर्ण<br>३) संगणक अर्हते संबंधी शासनाने वेळोवेळी केलेल्या तरतुदी नुसार संगणक वापरा संबंधीची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. (MS-CIT) |
| ५ | ४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक { Civil Engineering Assistent }<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रु.२४०० | महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि<br>१) शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासकिय तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणारा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्ष मुदतीचा पाठयक्रम उत्तीर्ण<br>किंवा<br>२) स्थापत्य अभियांत्रिकी पदवी / पदविका किंवा त्याला समकक्ष अर्हता .<br>स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गासाठी ज्यांनी सन १९८०-८१ ते १९८६-८७ या कालावधीत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण केला आहे त्या उमेदवारांच्या बाबतीत शासकिय तंत्रशिक्षण विभागाकडे त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधिन राहून त्यांना वयोमर्यादा ४७ वर्ष पर्यंत राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गट-ड | |
| ६ | ५ | चौकीदार<br>वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रु. १३०० | इयत्ता ४ थी परीक्षा उत्तीर्ण . चौकीदार म्हणुन किमान एक वर्ष सेवा केल्याचा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक.<br>सुदृढ शरीरयष्टी आवश्यक आहे. |
| ७ | ५ | कालवा चौकीदार<br>वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रु. १३०० | इयत्ता ४ थी परीक्षा उत्तीर्ण . चौकीदार म्हणुन किमान एक वर्ष सेवा केल्याचा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक.<br>सुदृढ शरीरयष्टी आवश्यक आहे. |
| ८ | ५ | शिपाई<br>वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रु. १३०० | इयत्ता ४ थी परीक्षा उत्तीर्ण . |

उमेदवाराची अर्हता :

(क) संगणक अर्हता : (१) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O' स्तर किंवा 'A' स्तर 'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (२) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक किंवा GECT परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक.

(ड) माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(इ) शासनाने विहित केलेल्या निर्णयानुसार खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण कराव्या लागतील.

२१. अर्ज करण्याची पध्दत :

२१.१. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२१.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज (Website- संकेत स्थळ www.oasis.mkcl.org/wrd2011) या वेबसाईटद्वारे दिनांक ०४/०१/२०१२ ते २४/०१/२०१२ या कालावधीत भरणे आवश्यक राहील.

२१.३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना ( Website- संकेत स्थळ www.oasis.mkcl.org/wrd2011) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२१.४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (latest) (रुंदी ३.५ सें.मी. x उंची ४.५ सेंमी) व जास्तीत जास्त ६ महिन्याच्या आतील फोटो व स्वतःचा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व स्वतःचा फोटो स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

२१.५ ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी मार्गदर्शन व सूचना :

(१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे सुरु होण्याचा दिनांक व वेळ ४.१.२०१२ रोजी १०.०० वा.पासून

(२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ २४.१.२०१२ रोजी २३.५९ वा. पर्यंत

(३) परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक २.२.२०१२ पासून.

(४) लेखी परीक्षेचा दिनांक

| गट क्रमांक | पदनाम | दिनांक |
|---|---|---|
| गट-१ | वरिष्ट लिपीक, भांडारपाल | २६.२.२०१२ |
| गट-२ | सहाय्यक भांडारपाल | २६.२.२०१२ |
| गट-३ | कालवा निरीक्षक, दप्तर कारकुन, मोजणीदार | २६.२.२०१२ |
| गट ४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | २६.२.२०१२ |
| गट-५ | शिपाई, चौकीदार, कालवा चौकीदार | १९.२.२०१२ |

२१.६. अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

२२. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जा सोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल.

२३. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल.

२४. जाहिरातीतील पदांचा सेवा प्रवेशोत्तर पात्रतेबाबतचे सर्व निकष शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, आदेश व परिपत्रकानुसार विहीत वेळेत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२५. सदर पदे अस्थायी स्वरुपाची असून शासनाच्या धोरणात बदल झाल्यास, उमेदवाराची सेवा, एक महिन्याची नोटीस देवून केव्हाही समाप्त करण्यांत येईल.

स्थळ : औरंगाबाद.

दिनांक : २९.१२.२०११

सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती गट-क संवर्ग
तथा अधीक्षक अभियंता
दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ,
(पा.वि.) औरंगाबाद.

/२९१२२०११/.
D:\VIGID\2011\DECEMBER-11\EST-2 DFA-12 Add. 29122011.doc